# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.02.2026** **वारःरविवार**

---

**<u>ठळक बातम्या,</u>**
**<u>आता सविस्तर बातम्या</u>**
**<u>मलेशियात भारतीय डिजीटल पेमेंट प्लॅटफॉर्म युपीआय लवकरच सुरू होण्याची मोदींची घोषणा.</u>**
**<u>भारत आणि अमेरिका दरम्यान व्यापार कराराच्या अंतरिम आराखड्यावर दोन्ही देशांची काल सहमती.</u>**
**<u>भारतीय बनावटीच्या २ नॅनोमीटर सेमीकंडक्टर चीपचं वैष्णव यांच्या हस्ते अनावरण.</u>**
**<u>आणि</u>**
**<u>वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताकडून अमेरिकेचा २९ धावांनी पराभव.</u>**

आता सविस्तर बातम्या

**<u>पंप्र-मलेशिया</u>**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यात बंद दाराआड चर्चा सुरू झाली आहे. तत्पुर्वी, पंतप्रधान कार्यालयात मोदींचे यथोचित स्वागत करण्यात आले. दोन्ही नेत्यांच्या चर्चेव्यतिरिक्त शिष्टमंडळ स्तरावरही चर्चा होणार आहे. यामध्ये व्यापार, आर्थिक सहकार्य, सामरिक संबंध, आणि उदयोन्मुख क्षेत्रांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. तसंच दोन्ही देशांदरम्यान सर्वसमावेशक सामरिक भागीदाराचा आढावाही घेण्यात येणार आहे.
दरम्यान, काल दौऱ्याच्या पहिल्या दिवशी पंतप्रधानांनी क्वालालंपूरमध्ये 'सेलामत दातंग मोदी जी' नावाच्या प्रवासी भारतीय समुदायाच्या मेळाव्याला संबोधित केले. मेळाव्यात बोलताना मोदींनी भारत आणि मलेशियातील सखोल वैयक्तिक आणि परस्पर लोकसंबंधांवर प्रकाश टाकला. यावेळी भारताचे युपीआय हे डिजीटल पेमेंट प्लॅटफॉर्म लवकरच मलेशियात सुरू होईल अशी घोषणा पंतप्रधानांनी केली. त्याशिवाय प्रवासी भारतीयांसाठीच्या कार्डाची सुविधा सहाव्या पिढीपर्यंत वाढवण्यात आल्याचे सांगून, भारतात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तिरुवल्लुवर शिष्यवृत्ती सुरू करण्याची घोषणाही केली. त्याबरोबर मलेशियामध्ये नवीन वाणिज्य दूतावास सुरू करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.
या मेळाव्याला पंधरा हजार प्रवासी भारतीयांची उपस्थिती होती. मलेशियातील प्रवासी भारतीय उभय देशांची मने जोडणारा जिवंत पूल असल्याचं ते म्हणाले. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याबरोबर असलेल्या दीर्घकालीन मैत्रीची आठवण करून देत, गेल्या वर्षी दिलेले मलेशिया भेटीचे वचन आता पूर्ण करत असल्याचं नमूद केलं. दोन्ही देशांनी २०२४मध्ये परस्पर संबंध धोरणात्मक भागीदारीपर्यंत वृद्धिंगत केले आहेत आणि आता दोन्ही देश परस्परांचा हात धरून वाटचाल करत यशाचा आनंद साजरा करत असल्याचे ते म्हणाले. दोन्ही देशांतील आर्थिक सहकार्यावर भर देताना, १०० हून अदिक भारतीय माहिती तंत्रज्ञान कंपन्या मलेशियामध्ये कार्यरत असल्याचं मोदी म्हणाले. या कंपन्या हजारोंच्या संख्येत रोजगार संधी निर्माण करत आहेत.

**<u>भाअव्याकरार</u>**
भारत आणि अमेरिका दरम्यान परस्पर फायदेशीर व्यापार कराराच्या अंतरिम आराखड्यावर दोन्ही देशांनी काल सहमती दर्शवली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने भारत-अमेरिका संयुक्त निवेदन जारी करत ही माहिती दिली आहे. हा आराखडा भारत अमेरिका यांच्यातील व्यापक व्यापार कराराच्या वाटाघाटींविषयीच्या दोन्ही देशांच्या वचनबद्धतेची पुष्टी करतो. या संयुक्त निवेदनानुसार, अमेरिका भारतीय वस्तूंवर १८ टक्के आयात शुल्क लागू करेल तर भारत, अमेरिकन बनावटीच्या सर्व औद्योगिक वस्तू आणि अमेरिकेच्या अन्न आणि कृष्टी उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीवरील शुल्क रद्द करणार आहे किंवा ते कमी करणार आहे.

**<u>पंतप्रधान नरेंद्र मोदी व्यापार आराखडा</u>**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यापार कराराचा अंतिम आराखड्यावरील सहमती ही चांगली बातमी असल्याचं म्हटलं आहे आणि दोन्ही देशांमधील संबंध बळकट करण्यासाठी वचनबद्ध असण्याबाबत त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांचे आभार मानले आहेत. पंतप्रधानांनी समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, हा अंतरिम आराखडा भारत - अमेरिका यांच्यातल्या भागीदारीतली सखोलता, विश्वास आणि गतीशीलता दर्शवणारा आहे असे नमूद केले आहे. यामुळे भारतातील कष्टकरी शेतकरी, उद्योजक, सूक्ष्म, लघु,मध्यम उद्योजक, स्टार्ट नवोन्मेषी तरुण,

मच्छिमारांसह अधिकाधिक लोकांना नव्या संधी उपलब्ध होऊन मेक इन इंडियाला बळकटी मिळेल शिवाय महिला आणि तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल, असेही या संदेशात नमूद केले आहे.

**गोयलव्याक**

दरम्यान, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी, भारतीय उत्पादनांच्या निर्यातीवरील भारत-अमेरिका अंतरिम व्यापार करारानुसार भारतीय निर्यातीवरील ५० टक्के आयात शुल्क आता १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आल्याची माहिती काल दिली. भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार करारासंदर्भातलं संयुक्त निवेदन जारी झाल्यानंतर वार्ताहर परिषदेत बोलत होते. हा करार न्याय, समान आणि संतुलित असल्याचं सांगून, या करारातून मका, गहू, तांदूळ, साखर, सोयाबीन, मसाले, चहा, कॉफी आंबा, पपई आदी कृषी उत्पादने आणि दुग्धजन्य पदार्थांना शुल्क सवलतीतून वगळण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. त्यामुळे देशातल्या शेतकऱ्यांच्या हिताचे संपूर्ण संरक्षण सुनिश्चित होते. या कराराचा उद्देश निर्यातवृद्धी, रोजगार निर्मिती आणि विकसित भारत २०४७च्या उद्देशाला गती देणे असा आहे. आगामी काळात दोन्ही देशांदरम्यानचा व्यापार करार ४५ लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचा सरकारचा उद्देश आहे. त्यामुळे खुल्या होणाऱ्या नव्या संधींचा व्यापाऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**अश्विनी वैष्णव**

भारत सेमीकंडक्टर उत्पादन परिसंस्थेच्या विकासात मोठी प्रगती करत असून, इतर देशांना उत्तम पर्याय प्रदान करत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केलं. बंगळुरू इथल्या क्वालकॉम निर्मित भारतीय बनावटीच्या २ नॅनोमीटर सेमीकंडक्टर चीपचं अनावरण वैष्णव यांच्या हस्ते झालं त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सेमी कंडक्टर क्षेत्रात जागतिक पातळीवर भारताला कौशल्य प्रदान करता येईल असा विश्वास यांनी यावेळी व्यक्त केला.

**सेशेल्स भारत भेट**

सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी, पाच दिवसांच्या भारत भेटीवर दाखल झाले आहेत. त्यांनी काल केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांची भेट घेतली. त्याशिवाय भारतीय उद्योग महासंघाद्वारे आयोजित भारत-सेशल्स गोलमेज परिषदेत सहभाग घेतला. गेल्या पन्नास वर्षांत उभय देशांचे संबंध अधिक दृढ झाले असून, परस्पर सहकार्य वाढवण्यास उत्सुक असल्याचं प्रतिपादन हर्मिनी यांनी केलं. तर उभय देश परस्पर लोकसंपर्क, सागरी संबंधांवर आधारित विश्वासार्ह भागीदारी सामाईक करत असल्याचं मंत्री सोनोवाल यावेळी म्हणाले.

**नेत्यानाहू-ट्रम्प**

इस्रायल पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू येत्या बुधवारी वॉशिंग्टनमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांची इराण चर्चेच्या संदर्भात भेट घेणार आहेत. या संदर्भात अमेरिका आणि इराण यांच्यादरम्यान शुक्रवारी अप्रत्यक्ष चर्चा झाली. नेत्यान्याहू यांच्या पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या निवेदनानुसार, या वाटाघाटींमध्ये बॅलास्टिक क्षेपणास्त्रांवर मर्यादा घालणे आणि इराणी गटांना मिळणारा पाठिंबा थांबवणे याचा समावेश असेल अशी अपेक्षा आहे. अणु चर्चा आणि मुख्य मुद्द्यांचे निराकरण शांत, तणावमुक्त आणि धमक्यांशिवाय वातावरणात व्हावे अशी अपेक्षा इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अराघची यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली आहे.

**नक्षली-गचि-पीटीसी-मंजुषा**

महाराष्ट्रात, छत्तीसगड आणि भामरागड तालुक्याच्या सीमावर्ती भागात झालेल्या चकमकीत पोलिसांनी नक्षल्यांच्या कंपनी क्रमांक १० चा म्होरक्या प्रभाकरसह ७ जहाल नक्षल्यांना ठार केलं. अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी काल गडचिरोलीत झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. आता जिल्ह्यात केवळ ७ नक्षली शिल्लक राहिले असून, ३१ मार्चपर्यंत नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. ठार झालेल्या नक्षलींवर दोनशे गुन्हे दाखल होते आणि महाराष्ट्र शासनाने त्यांची माहिती देणाऱ्यांसाठी एकंदर ७१ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं. छत्तीसगडमधे काल ५१ नक्षलींचं आत्मसमर्पण केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**भागवत**

'हिंदू' हे नाम नसून एक विशेषण आहे असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं आहे. ते काल मुंबईत संघाच्या शताब्दी सोहळ्याते बोलत होते. भारतात कोणीही 'अहिंदू' नसून त्यांचं सध्याचा धर्म कोणताही असो, समान वंश आणि सांस्कृतिक वारसा ते अधोरेखित करतात असं ते म्हणले. 'हिंदू' हा शब्द बाहेरून लादलेली ओळख म्हणून पाहिला जाऊ नये, तर 'भारताच्या मूल्यांशी जोडलेल्या लोकांसाठी एक सर्वसमावेशक विशेषण' म्हणून पाहिले पाहिजे, ज्यात भूमीबद्दलचा अभिमान, तिच्या संस्कृतीबद्दलची प्रशंसा आणि पूर्वजांच्या सामायिक गौरव यांचा समावेश आहे.

**<u>नेमबाजी</u>**

दिल्लीत सुरू असलेल्या आशिया रायफल -पिस्तुल अजिंक्यपद स्पर्धेत इलावेनिल वलारिवन हिने जपानच्या खेळाडूला चीत करत, महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारामध्ये सुवर्णपदक जिंकले. मेघना सज्जनारने कास्य पदक पटकावले. इलावेनिल, मेघना आणि आर्या बोरसे यांनी सांघिक सुवर्णपदकाला गवसणी घातली. तर कनिष्ठ गटात नेमबाज शांभवी क्षीरसागरनेही उल्लेखनीय कामगिरी करतसुवर्णपदक पटकावले. शांभवी, अनीशा आणि संद्राता रॉय यांनी तसेच अन्वी राठोड, हृद्या श्री कोंडूर यांच्या गटानेही सांघिक सुवर्णपदकाला गवसणी घातली. स्पर्धेच्या चौथ्या दिवशीच्या १० सुवर्णपदकांसह भारताच्या पदकांची संख्या ४३ झाली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल मुंबईतल्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात भारताने अमेरिकेचा २९ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने 161 धावा केल्या. तुलनेने अनुनभवी असलेल्या अमेरिकेच्या संघाने टिच्चून गोलंदाजी करत भारताची अवस्था 6 बाद 77 अशी केली होती. मात्र कर्णधार सूर्यकुमार यादवच्या 49 चेंडूतील 84 धावांनी आव्हानात्मक धावा केल्या. शॅडली वन शालवीक याने 4 गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल अमेरिका संघ 132 धावा करू शकला. भारताकडून मोहम्मद सिराजने 3 तर अर्शदीपसिंग आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. सूर्यकुमार यादवला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. भारताचा पुढील सामना येत्या 12 फेब्रुवारी रोजी नामिबियाविरुद्ध होणार आहे.

**<u>शेवटी पुन्हा ठळक बातम्या.</u>**
**<u>मलेशियात भारतीय डिजीटल पेमेंट प्लॅटफॉर्म युपीआय लवकरच सुरू होण्याची मोदींची घोषणा.</u>**
**<u>भारत आणि अमेरिका दरम्यान व्यापार कराराच्या अंतरिम आराखड्यावर दोन्ही देशांची काल सहमती.</u>**
**<u>भारतीय बनावटीच्या २ नॅनोमीटर सेमीकंडक्टर चीपचं वैष्णव यांच्या हस्ते अनावरण.</u>**
**<u>आणि</u>**
**<u>वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताकडून अमेरिकेचा २९ धावांनी पराभव.</u>**

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.